N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** बारामती
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0369 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/09/2025 01:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 10/09/2025
**Date To ( दिनांक पर्यत):** 10/09/2025
**Time From (वेळेपासून):** 11:30 बजे
**Time To (वेळेपर्यत):** 13:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/09/2025 **Time (वेळ):** 01:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/09/2025 01:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बारामती तालुका पोलीस स्टेशनमध्

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस निरीक्षक बारामती तालुका पोलीस स्टेशन

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमोल तुळशीराम माघाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 4/5 अर्बन ग्राम, बी विंग, छत्र,बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 4/5 अर्बन ग्राम, बी विंग, छत्र,बारामती,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9096333736

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अंजना बिभीषण नागरगोजे | | | 1. महिला पोलीस हवालदार, बन 230,बारामती,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ | 20,000.00 |



पोलीस निरीक्षक बारामती तालुका पोलीस स्टेशन

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

बारामती तालुका पोलीस स्टेशन गुरनं 369/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,7(अ)
मी अमोल तुळशीराम माघाडे वय- 39 वर्षे, व्यवसाय - हायड्रोलीक्स पाईप कारखाना, रा. 4/5 अर्बन ग्राम, बी विंग, छत्रपती संभाजीनगर, भिगवण रोड, ता बारामती, जि. पुणे मो. 9096333736

मी वर नमुद ठिकाणी माझे आई-वडील व पत्नीसह राहणेस आहे. माझा मेव्हणा नामे सत्यजित दत्तात्रय गोडसे हा सध्या नोकरीनिमीत्त परदेशात आहे. माझ्या मेव्हण्याची पत्नी नामे सौ शिवानी सत्यजित गोडसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माझेविरुद्ध, माझी पत्नी सौ. अमृता अमोल माघाडे, माझे सासरे श्री. दत्तात्रय बापु गोडसे, सासु श्रीमती संगीता दत्तात्रय गोडसे आणि मेहुणा नामे सत्यजित दत्तात्रय गोडसे यांचेविरुध्द बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रं. 362/2025 भारतीय दंड विधान कलम 498अ, 323, 504, 506 अन्वये दि. 02/09/2025 रोजी दाखल करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाचा तपास बारामती तालुका पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस हवालदार नागरगोजे मॅडम यांच्याकडे आहे. दि. 08/09/2025 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास नागरगोजे मॅडम यांनी त्यांचा मो.क्रं. 9552295858 यावरुन माझे सासरे श्री गोडसे यांचा मो.क्रं. 9167828825 यावर फोन करुन आमच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत माहिती देवुन आम्हा सर्वांना बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे हजर राहणेबाबत सांगीतले होते. त्याबाबत माझे सासरे यांनी मला माहिती दिलेनंतर मी व माझे सासरे त्याच दिवशी दुपारी 01.00 वा. चे सुमारास बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे जावुन नागरगोजे मॅडम याना भेटलो. त्यावेळी त्यांनी आम्हाला दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत आम्हाला माहिती देवुन,त्या गुन्हयामध्ये आम्हा सर्वांना अटक न करता गेट जामीन करुन देते त्यासाठी मला 1 लाख रुपये दयावे लागतील असे बोलुन मागणी केली. त्यावेळी आम्ही दोघांनी त्यांचे एक लाख रुपयांच्या मागणीला नकार देवुन आम्ही पोलीस स्टेशनमधुन निघुन गेलो. त्यानंतर काही वेळाने मी नागरगोजे मॅडम यांना त्यांच्या एक लाख रुपयांच्या मागणीमध्ये काही कमी जास्त करतात का याचा अंदाज घेण्यासाठी, फोन केला असता मी काही बोलण्याअगोदरच त्यांनी आम्हाला भेटण्याकरीता बारामती तालुका पोलीस स्टेशनला बोलविल्याने आम्ही दोघेजण पुन्हा त्यांना त्याच दिवशी दुपारी 3.30 वा चे सुमारास बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी मला "तुमचा मेव्हणा परदेशात आहे, आपण त्याचे नंतर पाहु, परंतु तुम्हाला, तुमच्या पत्नीला व सासु-सास-यांना दाखल गुन्हयात गेट जामिन करुन, अटक न करणेसाठी प्रत्येकी 5000/- रुपये असे एकुण 20,000/- रुपये दयावे लागतील" असे बोलुन पैशाची मागणी केली. या गोष्टीबद्दल मी माझे सासु-सासरे व पत्नीबरोबर चर्चा करुन नागरगोजे मॅडम आपल्याकडे लाच मागत असुन त्यांचे विरुध्द मी अॅन्टी करप्शनकडे तक्रार करणार असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांची हरकत नसल्याचे सर्वांनी सांगितले.

त्यानंतर मी दि. 09/09/2025 रोजी सकाळी 09.55 वा चे सुमारास अॅन्टी करप्शन पुणे विभागातील कार्यालयाच्या फोनवर तक्रारीसंदर्भात फोन केला असता, फोनवरील समोरच्या कर्मचारी यांनी मला श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधिक्षक यांचा फोन नंबर दिला. त्यानंतर मी लगेच सकाळी 09.58 वा. गावडे साहेबांना फोन करुन माझी तक्रार असलेबाबत सांगीतले. त्यावेळी गावडे साहेबांनी "नेमकी काय तक्रार आहे, कशाबद्दल तक्रार आहे, कोणाविरुद्ध तक्रार आहे, याबाबत माझ्याशी प्राथमिक चर्चा करुन मला अॅन्टी करप्शन विभागातील पोलीस निरीक्षक श्रीमती सावळे मॅडम यांचा फोन नंबर माझ्या मोबाईलच्या व्हॉट्सअॅपवर पाठवुन या आमच्या अधिकारी तुमच्या तक्रारीवर पुढील कारवाई करतील" असे सांगितले. त्यानंतर दुपारी 12.38 वा मला माझे मोबाईलवर अॅन्टी करप्शनच्या पोलीस निरीक्षक श्रीमती सावळे मॅडम, यांनी संपर्क साधुन माझे तक्रारीबाबत प्राथमिक विचारणा करुन माहिती घेतली. त्यावेळी मी त्यांना माझी तक्रार थोडक्यात सांगुन पोलीस हवालदार नागरगोजे मॅडम यांनी मला दि.10/09/2025 रोजी भेटण्यास बोलविल्याचे सांगितल्यानंतर, श्रीमती सावळे मॅडम यांनी मी सांगितलेल्या तक्रारीवर दि. 10/09/2025 रोजी पुढील कार्यवाही करया असे सांगितले.



पोलीस निरीक्षक * बारामती तालुका पोलीस स्टेशन *

दिनांक 09/09/2025 रोजी मी फोनवर दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनि सावळे मॅडम व त्यांचे पथक आज दि.10/09/2025 रोजी सकाळी 10:10 वा. सुमारास माझे बारामती एमआयडीसी मधील हायड्रोटेक इंडस्ट्रीज, डि 20/3 येथील कंपनीचे कार्यालयात आले. पोनि सावळे मॅडम यांनी त्यांची, त्यांचेकडील सापळा पथक, त्यांचेसोबत आलेले पंच यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी मला माझी तक्रार विचारल्यानंतर सुरुवातीस मी माझी तक्रार तोंडी सांगुन, नंतर मी माझ्या हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. ती त्यांनी वाचुन पाहिली तसेच त्यांचेसोबत असलेल्या पंच श्रीमती संगीता आढाव व दुसरे परशुराम शेलार यांना वाचुन दाखविली त्यानंतर लेखी तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यानंतर पोनि सावळे मॅडम यांनी मला व्हाईस रेकॉर्डर दाखवुन ते नेमक कसे काम करते याबाबत प्रत्यक्ष दाखवुन माहीती दिली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पंच 1 म्हणुन श्रीमती संगीता रंभाजी आढाव, वय 28 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, तहसील कार्यालय हवेली, पुणे व पंच क्रं 2 म्हणुन श्री. परशुराम हणमंत शेलार, वय 39 वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी, तहसील कार्यालय हवेली, पुणे हे पंच म्हणुन काम पाहतील असे पोनि सावळे यांनी ठरविले. लेखी दिलेली तक्रार तोंडी सांगीतलेल्याप्रमाणे असल्याने मी, सावळे मॅडम व दोन्ही पंचानी लेखी तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोनि सावळे यांनी मला अँटी करप्शनकडे दिलेल्या तक्रारीवर कशा प्रकारे कारवाई केली जाते याबाबत हजर असलेल्या दोन्ही पंचांसमक्ष मला माहीती दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोनि सावळे मॅडम यांनी माझे, पंच क्रं 1 संगीता आढाव व पंच क्रं 2 परशुराम शेलार यांचे निवेदन 11.20 वा. व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले. पोलीस हवालदार नागरगोजे मॅडम, बारामती तालुका पोलीस स्टेशन या लाचेची मागणी करतात किंवा कसे यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी कारवाई माझे कंपनीचे कार्यालयातुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. लाच मागणी पडताळणी कारवाई करीता जाणेकरीता माझेकडील पांढ-या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची ब्रि◌झा कार चारचाकी क्रं एमएच 42 एएस 8080 वापरण्याचे ठरवीले. त्यावेळी पोनि सावळे मॅडम यांनी माझ्यासोबत पाठविण्यात येणा-या पंच क्रं 1 यांचेबाबत संशय येऊ नये म्हणुन पडताळणी कारवाई करीता जाताना माझ्या पत्नीलाहि सोबत ठेवावे जेणेकरुन माझ्या सोबतच्या पंच क्रं 1 यांचेबाबत पोहवा नागरगोजे मॅडम यांना संशय येणार नाही. त्याप्रमाणे पोनि सावळे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझ्या पत्नीला फोन करुन तुलाही माझेसोबत पोलीस स्टेशनला यायचे असलेबाबत कळवीले. त्यानंतर पोनि सावळे मॅडम यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईमध्ये काय खबरदारी घ्यावी याबाबत मला व पंच क्रं 1 श्रीमती आढाव यांना सुचना दिल्या. व त्यांचे आदेशाप्रमाणे पोलीस अंमलदार ठाकुर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे शर्टच्या आतमध्ये सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला. ती वेळ सकाळी 11.39 वा ची होती. यापुर्वी ठरविल्याप्रमाणे पोनि सावळे मॅडम यांनी मला व पंच क्रं 1 श्रीमती आढाव यांना माझेकडील मारुती ब्रि◌झा कारमधुन रवाना केले. त्यावेळेस मी स्वत: गाडी चालवित होतो व पंच श्रीमती. आढाव या माझे गाडीच्या मागील सिटवर बसलेल्या होत्या. अशा परिस्थीतीत आम्ही लाच पडताळणी कारवाई करीता बारामती तालुका पोलीस स्टेशनकडे निघालो. बारामती तालुका पोलीस स्टेशनकडे जाणा-या रस्त्यावर असलेल्या माझ्या घरासमोर मी काहि वेळ थांबलो असता, माझ्या बायकोला यापुर्वी कळवील्याप्रमाणे माझी बायको घरातुन रस्त्यावर आली व मी चालवीत असलेल्या ब्रि◌झा गाडीच्या माझ्या बाजुच्या सीटवर येऊन बसली. त्यानंतर आम्ही तिघेजण बारामती तालुका पो स्टे कडे निघालो काहिवेळात आम्ही बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे पोहोचलो. पोलीस स्टेशन आवारात मी माझी गाडी पार्क करुन मी, माझी पत्नी अमृता व पंच श्रीमती आढाव असे बारामती तालुका पोलीस स्टेशनमधील बीट अंमलदार कक्षामध्ये गेलो. त्यावेळी नागरगोजे मॅडम सरकारी युनीफॉर्ममध्ये एका खुर्चीवर बसलेल्या होत्या त्यांचे समारील टेबलच्या बाजुला आम्ही तिघेजण जवुन उभा राहिलो. मी नागरगोजे मॅडम यांचेसोबत माझे व माझे कुटुंबातील सदस्यांविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी पोलीस हवालदार नागरगोजे मॅडम यांनी मला "आलेत का सगळे?" अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना "ते दोघेजण (सासु-सास-यांना उद्देशुन) कोर्टात गेले आहेत. आता हिची (पत्नीला उद्देशुन) प्रोसेस करुन घ्या" असे बोललो. त्यावेळी नागरगोजे मॅडम यांनी मला उजव्या हाताचा अंगठा शेजारील बोटावर घासुन पैशांबद्दल इशारा करत "तुम्हाला सांगीतलेत ना सगळे" अशा बोलल्या. त्यावेळी मी त्यांना "किती करायचेत म्हणजे, त्याच्यात काय थोडफार" असे बोललो. त्यावेळी त्या मला "परत एकदा" अशा बोलल्या. त्यानंतर मी त्यांना "तुम्ही वीस हजार म्हणताय ना" असे बोललो. त्यावर नागरगोजे मॅडम मला "हं... हं.." अशा बोलल्या. त्यावर मी त्यांना "थोडेफार कमी करा ना" असे बोललो. त्यावेळी नागरगोजे मॅडम मला "वीस करायला लागतील, कस होत माहितीय का" अशा बोलल्या. त्यावर मी त्यांना "हा अं.." असे प्रश्नार्थक विचारणा केली. त्यावर त्या मला "मला पण खुप जणांच असत, मी काही एकटी नाहीये, तुम्हाला तर सगळी सीस्टीम माहितीये" अशा बोलल्या. त्यावर मी त्यांना "ओके" म्हणालो. त्यानंतर नागरगोजे मॅडम यांनी मला व माझ्या पत्नीला अटक न करणेसंदर्भात कागदपत्रावर सही घेऊन आमचेवर दाखल झालेल्या गुन्हयाच्या अनुशंगाने चर्चा केली. त्यानंतर मी नागरगोजे मॅडम यांना "तुम्ही किती वेळ आहात इथं" असे विचारले त्यावर नागरगोजे मॅडम

पोलीस निरीक्षक
बारामती तालुका पोलीस स्टेशन

मला "मी आहे दिवसभवर आहे" अशा बोलल्या त्यावर मी त्यांना "ठिकय, मग मी तासाभरात येतो, अध्र्या एक तासात" असे आमचेमध्ये झालेले सर्व संभाषण पंच क्रं 1 श्रीमती आढाव यांनी प्रत्यक्ष माझ्या बाजुला उभे राहुन समक्ष ऐकले व पाहीले आहे. त्यानंतर मी, माझी पत्नी व पंच क्रं 1 असे बारामती तालुका पोलीस स्टेशन मधुन बाहेर येऊन माझ्या वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी निघालो. पुढे माझ्या घरासमोर आल्यावर गाडीतील माझ्या पत्नीला माझे राहते घरासमोरील रस्त्यावर सोडुन मी व पंच क्रं 1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोनि सावळे मॅडम यांचे आदेशान्वये पोलीसस अंमलदार ठाकुर यांनी माझे जवळील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ दुपारी 12.17 वा ची होती. तेथे आल्यानंतर पोनि सावळे मॅडम यांनी प्रथम मला व त्यानंतर पंच क्रं 1 यांना पंच क्रं 2 शेलार यांचेसमक्ष पडताळणी कारवाई करीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यंत घडलेली हकीकत विचारली असता आम्ही दोघांनी घडलेली हकिकत आळीपाळीने पोनि सावळे मॅडम व पंच क्रं 2 शेलार यांचेसमक्ष कथन केली. त्यानंतर पोनि सावळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता एकंदरीत मी व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेल्या हकिकतीवरुन व व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन माझ्या व माझ्या नातेवाईकांवर बारामती तालुका पो स्टे येथे दाखल गुन्हयाच्या अनुशंगाने श्रीमती. नागरगोजे, पोलीस हवालदार, बारामती तालुका पोलीस स्टेशन यांनी आम्हाला गुन्हयात अटक न करणेसाठी माझ्याकडे 20,000/- रुपयांची लाच रक्कम स्वत:करीता व इतरांकरीता मागीतल्याचे निष्पन्न झाले.

लोकसेवीका नागरगोजे यांनी तासाभरात लाच रक्कम घेऊन बोलावले असल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि सावळे मॅडम यांनी लोकसेवीका नागरगोजे यांनी मागणी केल्याप्रमाणे 20,000/- रुपये लाच रक्कम मला हजर करण्याबाबत सांगितले असता मी माझेकडील बचतीतील 20,000/- रुपये रक्कम हजर केली. त्यानंतर पो.नि. सावळे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार तावरे यांनी पंच  यांनी पंच क्रं 2 शेलार यांच्या मदतीने मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 40 नोटांचे नंबर एका को¬-या कागदावर आमचे समक्ष लिहीले. सदर कागदावर दोन्ही पंच व पोनि सावळे यांनी सहया केल्या. त्यानंतर पो.नि. सावळे यांचे सुचनेवरुन सापळा पथकातील चालक पोलीस अंमलदार/दिवेकर यांनी माझ्या कंपनीचे कार्यालयात मला व कारवाई करीता असलेल्या दोन्ही पंचांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाइतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन स◌ागुन लाच रकमेला अँथ्रासिन पावडर लावली व त्या अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा पोलीस अंमलदार दिवेकर यांनी माझे शर्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवल्या. त्यावेळी पोनि सावळे मॅडम यांनी पोहवा नागरनोजे मॅडम यांना लाच रक्कम देतेवेळी मी माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन पोहवा नागरगोजे मॅडम यांचेसमोर धरावी अशी सुचना दिली. त्यानंतर पोलीस अंमलदार दिवेकर यांनी त्य◌ाचे हात स्वच्छ पाण्याने धुतले त्यानंतर पोनि सावळे मॅडम यांनी चालक पोलीस अंमलदार दिवेकर यांना सापळा पथकातुन पुढील कारवाईसाठी वगळले. त्यानंतर पो.नि. सावळे यांनी मला, दोन्ही पंचांना व उर्वरीत सापळा पथकास सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. त्यामध्ये लाच रक्कम पोलीस नागरगोजे मॅडम यांना दिल्यानंतर पँटच्या डाव्या खिशातील हातरुमाल डाव्या हाताने काढुन तोंडावरुन फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्यास सांगीतले तसेच पोनि सावळे मॅडम यांनी पोलीस अंमलदार तावरे यांना त्यांचे मोबाईल फोनमध्ये सापळा कारवाईचे संपुर्ण चित्रीकरण करावे अशी सुचना दिली. तसेच सापळा कारवाई करीता बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे जातानाही माझ्या ब्रि◌ाझा कारचा वापर करावा असे ठरविण्यात आले.

त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुशंगाने पोनि सावळे यांनी माझे व पंच क्रं 1 यांचे सापळा निवेदन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि सावळे मॅडम यांचे सुचनेप्रमाणे पोलीस अंमलदार ठाकुर यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आत सेफटी पिनच्या साहयाने लावुन दिले ती वेळ दुपारी 01.18 वा ची होती. पोनि सावळे मॅडम यांनी मला व पंच नं. 1 श्रीमती. संगीता आढाव यांना यापुर्वी ठरल्याप्रमाणे माझे ब्रि◌ाझा गाडीतुन सापळा कारवाईकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी माझी ब्रि◌ाझा गाडी चालवायला बसलो पंच क्रं 1 श्रीमती. संगीता आढाव या माझ्या गाडीच्या मागच्या सिटवर बसल्या. अशा परिस्थीत आम्ही सापळा कारवाईकरीता निघालो. आम्ही निघाल्यावर आमचे मागोमाग संपुर्ण सापळा पथक त्यांचे गाडीतुनही बारामती तालुका पोलीस स्टेशनच्या दिशेने निघाले. काहिवेळानंतर मी व पंच क्रं 1 माझ्या गाडीतुन व सापळा पथक त्यांचे गाडीतुन बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे पोहोचलो. मी माझी गाडी बारामती तालुका पोलीस स्टेशन आवारात पार्क करुन पंच क्रं 1 श्रीमती आढाव यांचेसह माझे गाडीतुन खाली उतरुन बारामती तालुका पोलीस स्टेशन  मध्ये जात होतो. त्यावेळी संपुर्ण सापळा पथक त्यांचे गाडीच्या खाली उतरुन बारामती तालुका पोलीस स्टेशन आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबल्याचे मला दिसले. तेव्हा मी व पंच क्रं 1 आढाव पोलीस स्टेशनमधील बीट अंमलदार कक्षामध्ये गेलो त्यावेळी लोकसेवीका पोलीस हवालदार नागरगोजे या बीट अंमलदार कक्षामध्ये सरकारी युनीफॉर्ममध्ये त्या ठिकाणी उपस्थित होत्या.



पोलीस निरीक्षक
बारामती तालुका पोलीस स्टेशन

आम्ही पोलीस स्टेशन बीट अंमलदार कक्षामध्ये गेलेनंतर पो नि सावळे व पोलीस अंमलदार ठाकुर हे आमचे मागोमाग पोलीस स्टेशनच्या आतमध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने येऊन थांबल्याचे मला दिसले. त्यानंतर पोलीस नागरगोजे मॅडम यांनी मला माझ्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये मला अटक न करणेची नोटीस माझ्यासमोर ठेवुन मला सही करण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी त्या नोटीसीवर सही केली. त्यानंतर मी त्यांना "पेमेंट" असे बोललो त्यावेळी नागरगोजे मॅडम यांनी मला कक्षाबाहेर येणेबाबत इशारा करुन त्या त्यांच्या खुर्चीवरुन उठुन पोलीस स्टेशनमधील बीट अंमलदार कक्षासमोरील मोकळ्या जागेत बाहेर गेल्या, त्यावेळी मी व पंच क्रं 1 त्यांचे इशा-याप्रमाणे त्यांचे मागोमाग बिट अंमलदार कक्षाबाहेर गेलो. त्यानंतर मी माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन नागरगोजे मॅडमसमोर धरली असता सदरची लाच रक्कम नागरगोजे मॅडमने यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पॅंटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशात ठेवली. त्यावेळी नागरगोजे मॅडम मला "थॅंक्यु" असे म्हणाल्या. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्याचेवळी पोनि सावळे मॅडम व त्यांचे पथक तात्काळ बिट अंॅमलदार कक्षासमोरील मोकळया जागेत आले त्यावेळी पोलीस अंमलदार ठाकुर यांनी माझ्या कडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला. ती वेळ दुपारी 01.38 वा ची होती. त्याचवेळी पोनि सावळे मॅडम यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, मी नागरगोजे मॅडम यांचेकडे बोटाने इशारा केला. त्यावेळी म.पो.अंमलदार शेटे यांनी नागरगोजे मॅडमचा डावा हात मनगटाच्या वर पकडला व पोनि सावळे मॅडम यांनी त्याचा उजवा हात मनगटावच्या वर पकडुन त्यांना ताब्यात घेऊन बीट अंमलदार कक्षामध्ये आणले त्यावेळी यापुर्वी ठरल्याप्रमाणे पोलीस अंमलदार तावरे यांनी त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्डींॅग सुरु केले. ताब्यात घेतलेल्या महिलेला त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव अंजना बिभीषण नागरगोजे, वय 38 वर्षे, पद – महिला पोलीस हवालदार, ब.नं. 2309 नेमणुक - बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण रा. फलॅट नं 201, इ विंग, निर्मीती विहार सोसायटी, रुई, ता. बारामती, जि. पुणे असे सांगीतले. त्यावेळी पोनि सावळे यांनी सदर महिलेस लाच रक्कम कोठे आहे या बाबत विचारणा केली असता पोहवा नागरगोजे यांनी त्याचे उजव्या हाताने त्याचे पॅन्टच्या मागील बाजुच्या उजव्या खिशातुन लाच रक्कम काढुन पोनि सावळे यांचेसमक्ष धरली. त्यानंतर सदरची रक्कम पोनि सावळे मॅडम यांचे सांगण्यावरुन पंच क्रं 2 शेलार ती रक्कम ताब्यात घेतली. त्यावेळी त्यांनी ती रक्कम मोजुन त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 40 नोटा असे एकुण 20000/- असल्याचे सांगीतले. त्यानंतर सापळा पथकाने त्या नोटांच्या नंबरची तपासणी केली असता सापळापुर्व कारवाई मध्ये एका को-या कागदावर लिहीलेल्या नंबरच्याच नोटा असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर पो.नि. सावळे मॅडम यांनी बीट अंमलदार कक्षामध्ये अंधार करुन लोकसेवीका नागरगोजे यांनी स्विकारुन काढुन दिलेली व सध्या पंच क्रं 2 शेलार यांच्या ताब्यात असलेली लाच रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्यामध्ये तपासणी केली असता सदर लाच रकमेवर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोहवा नागरगोजे मॅडम यांनी ज्या हाताने लाच रक्कम स्विकारलेली आहे त्या त्यांच्या उजव्या हाताच्या पे-यावर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच त्यांनी ती लाच रक्कम तक्रारदाराकडुन स्विकारुन त्यांचे अंगावरील त्यांचे खाकी रंगाच्या पॅंटच्या उजव्या बाजुच्या मागील खिशामध्ये ठेवली होती त्या खिशाच्या तोंडावर व आतील बाजुस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि सावळे यांनी माझ्या उजव्या हाताची व शर्टच्या डाव्या खिशाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यावेळी पोनि सावळे यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार तावरे यांनी त्यांचे मोबाईमधील चित्रीकरण करण्याचे थांबवीले. त्यानंतर पो.नि. सावळे यांनी लोकसेवीका अंजना नागरगोजे यांचेकडे माझे व माझ्या कुटुंबातील सदस्यांविरुध्द दाखल गुन्हयातील कागदपत्रांबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी ते कागदपत्र त्यांचे टेबलवर असल्याचे सांगीतल्याने ते कागदपत्र ताब्यात घेतले.

तरी दि. 10/09/2025 रोजी सकाळी 11.30 ते दुपारी 01.40 वा दरम्यान झालेल्या पडताळणी व सापळा कारवाई मध्ये बारामती तालुका पोलीस स्टेशनमध्ये अंजना बिभीषण नागरगोजे, वय 38 वर्षे, पद – महिला पोलीस हवालदार, ब.नं. 2309 नेमणुक - बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांनी माझे व माझ्या कुटुंबातील सदस्यांविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तपास अधिकारी या नात्याने मला व माझे इतर तिन नातेवाईकांना अटक न करणेसाठी एकुण 20,000/- रुपयांची लाच स्वत:करीता व इतरांकरीता मागुन माझ्याकडुन सदरची लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी अंजना बिभीषण नागरगोजे, वय 38 वर्षे, पद – महिला पोलीस हवालदार, ब.नं. 2309 नेमणुक - बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला असून, तो माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

दाखल अंमलदार --पो हवा खारतोडे/828

पोलीस निरीक्षक ★ बारामती तालुका पोलीस स्टेशन ★

तपास—पो नि सर्वदा सावळे लाचलुचपत प्रतिबंध विभाग पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

vaishali raosaheb patil(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Mr. Amol T. Maghade

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

पोलीस-ठाणे अंमलदार
बारामती तालुका पोलीस ठाणे

**Name** (नाव): vaishali raosaheb pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस निरीक्षक
बारामती तालुका पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)